# प्रा.धनराज लझडे यांना पीएचडी प्रदान



प्रा. लझडे

देगलूर : देगलूर महाविद्यालयातील तत्त्वज्ञान विषयाचे प्रा. धनराज लझडे यांना 'स्वारातीम' विद्यापीठाने पीएचडी पदवी प्रदान केली आहे. त्यांनी 'भगवान बुद्ध यांचे सामाजिक तत्त्वज्ञान : एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर माजी प्राचार्य डॉ. वामन पाटील (दयानंद कला महाविद्यालय, लातूर) यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य पूर्ण केले आहे. त्यांनी प्राप्त केलेल्या या यशाबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सुर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ. कर्मवीर उंग्रतवार, गंगाधर जोशी, जनार्दन चिद्रावार, रवींद्र अप्पा द्याडे, देवेंद्र मोतेवार, चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. मोहन खताळ, ऊपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी वर्गाने आभिनंदन केले आहे.

Scanned with OKEN Scanner